**संयुक्त गस्ती उपक्रम :**

मत्स्य व्यवसाय विभाग व कांदळवन कक्ष, महाराष्ट्र वन विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये संयुक्त गस्तीचा उपक्रम २०१९ व २०२० या वर्षांकरिता राबविण्यात आला होता. या संयुक्त गस्तीमुळे राज्याच्या सागरी जलक्षेत्रात होत असलेली अवैध्य मासेमारी व तसेच दुर्मिळ प्रजातींचे रक्षण करण्यास मदत मिळाली. सन २०१९ आणि २०२० मध्ये मत्स्य व्यवसाय विभाग व कांदळवन कक्षातर्फे सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी २ गस्ती नौका भाडेतत्वावर घेण्यात आल्या होत्या. या गस्तीद्वारे सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या सागरी जल क्षेत्रात फेब्रुवारी ते मे २०१९ दरम्यान मासेमारी नौकांची तपासणी करून, अवैध्यरित्या मासेमारी करणाऱ्या मासेमारी नौकांवर मत्स्य व्यवसाय विभागातर्फे  कार्यवाही  करण्यात आली होती. सदर कामासाठी सुमारे रु. १३,५२,०००/- एवढी रक्कम कांदळवन प्रतिष्ठानतर्फे अदा करण्यात आली होती.

त्याचप्रमाणे मागील वर्षी म्हणजेच माहे मे २०२० या कालावधीत सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांच्या सागरी  जल क्षेत्रात मासेमारी नौकांची तपासणी करून या उपक्रमाद्वारे सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी रु. ३,५२,०००/- व रत्नागिरी जिल्ह्यासाठी रु. ३,२०,०००/-  अशी एकूण रु. ६,७२,०००/- एवढी रक्कम कांदळवन प्रतिष्ठानतर्फे सहाय्यक आयुक्त, मत्स्यव्यवसाय, सिंधुदुर्ग व रत्नागिरी यांना अनुक्रमे अदा करण्यात आली आहे.